सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६१३८५९००

क्रमांक:रासेमु-०२/जा.क्र.५७/२०२६/अठरा दिनांक - २१ सप्टेंबर, २०२६

## प्रसिध्दीपत्रक

**विषय**:- आयोगामार्फत घेण्यात येणा-या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२६ या पारंपरिक/ वर्णनात्मक स्वरुपाच्या परीक्षेकरीता उत्तरपुस्तिकेचा नमुना उमेदवारांच्या माहितीकरीता उपलब्ध करून देण्याबाबत...

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२६ चे दिनांक ३, ४, ५, १०, ११, १७, १८, ३१ ऑक्टोबर व ०१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. सदर परीक्षा पारंपरिक/ वर्णनात्मक स्वरुपाची आहे. आयोगामार्फत सध्या पारंपरिक/ वर्णनात्मक स्वरुपाच्या परीक्षेच्या उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन डिजिटल मुल्यांकन प्रणालीद्वारे (On Screen Marking) करण्यात येत आहे.

२. केंद्रिय लोकसेवा आयोग तसेच अन्य काही राज्य लोकसेवा आयोगांकडून पारंपरिक/ वर्णनात्मक स्वरुपाच्या परीक्षांसाठी प्रश्नपत्रिकेसह उत्तरपुस्तिका (Question Cum Answer Booklet) वापरण्यात येते.

३. त्याच धर्तीवर उमेदवारांना लिहिण्याच्या दृष्टीने सुलभ जावे आणि उत्तरपुस्तिकांचे On Screen Making System द्वारे मुल्यांकनाचे कामकाज सुकर व्हावे या दृष्टीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२६ च्या परीक्षेकरिता प्रश्नपत्रिकेसह उत्तरपुस्तिका (Question Cum Answer Booklet) उपलब्ध करून देण्यात येणार आहेत याची सर्व उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी. सदर प्रश्नपत्रिकेसह उत्तरपुस्तिकेमध्ये (Question Cum Answer Booklet) प्रत्येक प्रश्नाखाली उत्तर लिहण्यासाठी उमेदवारांना पुरेशी/ पर्याप्त जागा उपलब्ध करुन देण्यात येणार असून याबाबत उमेदवारांनी कोणताही संभ्रम बाळगु नये.

४. उपरोक्त परीक्षेकरिता वापरण्यात येणा-या प्रश्नपत्रिकेसह उत्तरपुस्तिकेचा (Question Cum Answer Booklet) नमुना आयोगाच्या संकेतस्थळावरील Candidate Information>>Specimen Answer Booklet या सदराखाली उमेदवारांच्या माहितीकरीता लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल.

ठिकाण: नवी मुंबई

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग